RUN BY... SUBHEDAR RAMJI AMBEDKAR EDUCATION SOCIETY, WARDHA

# MAHATMA JYOTIBA FULE COLLEGE OF SOCIAL WORK, YAVATMAL

(College Code : 442)

(AFFILIATED TO SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY,

Rajratan Nagar, Dhamangaon Road, Yavatmal - 445001(M.S.) Ph. 07232-240536, 2402371 E-mail: mjfcswytl@gmail.com Website: www.mjfcsw.edu.in

Date-29/08/2023

Ref: NAAC 2023/ MLD/Cr-2.4.1

| | |
|---|---|
| **Criteria 2.4.1** | **Percentage of full-time teachers against sanctioned posts during the last five years** |
| **Findings of DVV** | Provide Sanction letters (in English) indicating number of posts (including Management sanctioned posts) by competent authority. |
| **Response/ Clarification** | **As per the clarification, sanction letter/government resolution from Social Welfare Department of State Govt of Maharashtra highlighting approved seats is attached. (Appendix I)** |

**IQAC Coordinator**
Mahatma Jyotiba Fule College of Social Work Yavatmal-445001

Mahatma Jyotiba Fule College of Social Work 442 Yavatmal

**Principal**
Mahatma Jyotiba Fule College of Social Work Yavatmal

Scanned with OKEN Scanner

# Appendix I

महात्मा जोतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ येथील सहाय्यक प्राध्यापकांची २ पदे भरण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय : क्र. सकाम २०१९/प्र.क्र. ११४/सामासु
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ जून, २०१९

वाचा :
१) शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ४१/अर्थ-१ दिनांक ०२ जून, २०१५
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ६४/२०१५ वित्तीय सुधारणा -१, दि. १५ जानेवारी, २०१६.
३) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.सकआ /शिक्षण/सकाम/ना.प्र./मज्योफय/का-५ब/२०१८-१९/८०४, दि.३०.३.२०१९

**प्रस्तावना :**

महात्मा जोतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ यांनी दि. २.३.२०१९ च्या पत्रान्वये ४ सहाय्यक प्राध्यापकाची पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दि. ०२/०२/१९९९ अन्वये समाजकार्य चालविणा-या शाळा/संस्थांना मान्यता व अनुदान देण्याबाबतची संबंधीत नियमावली मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय दि. ०१.०९.२००५ अन्वये समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक कर्मचा-यांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर महाविद्यालयाची प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता ८० विद्यार्थी ठरविण्यात आली आहे. त्यानुसार महात्मा जोतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयातील मागील तीन वर्षातील प्रवेशित विद्यार्थी संख्या एकूण १०८५ आहे. दि.०१.०९.२००५ च्या शासन निर्णयानुसार १४:१ याप्रमाणे २५:८३ म्हणजेच अधिव्याख्याताची २६ पदे अनुज्ञेय आहेत. तथापि सदर पदापैकी

प्रत्यक्षात २२ अधिव्याख्यातांची पदे भरलेली आहेत. प्रवेशित विद्यार्थी संख्येचा विचार करता सहाय्यक प्राध्यापक ४ पदे मान्यतेसाठी प्रस्तावित आहेत.

सदर पदे पदभरतीवरील निर्बधाबाबत वित्त विभागाने निर्गमित केलेल्या दि. ०२ जून, २०१५ व दि. १५ जानेवारी, २०१६ अन्वये सरळसेवेच्या रिक्त पदाच्या ५०% पदे भरण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने महात्मा जोतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ या समाजकार्य महाविद्यालयास एकूण २ पदे भरण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महात्मा जोतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ या समाजकार्य महाविद्यालयास सहाय्यक प्राध्यापकाची एकुण २ रिक्त पदे भरण्यास याद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सदर पदे भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) अधिव्याख्याता/सहा.प्राध्यापक यांची २ पदे भरण्यासाठी प्रक्रीया राबविणेसाठी मान्यता उपरोक्त महाविद्यालय यांचा आकृतीबंध मान्यतेच्या अधीन राहून देण्यास हरकत नाही. उपरोक्त पदांसाठी/पदभरतीची अंतिम मान्यता आकृतीबंध निश्चित झाल्यावर तसेच उपरोक्त निवड प्रक्रीया नियमानुसार झाली याची खात्री झाल्यावरच देण्यात येईल.

२) वर नमुद करण्यात आलेल्या ०२ रिक्त जागा भरतांना एकूण कार्यभार (वर्कलोड) विचारात घेऊन संबंधित विद्यापिठाची मान्यता घ्यावी व त्यानुसार जाहिरात द्यावी.

३) सदर पदासाठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देतांना शासनाने रिक्त पदांकरीता विहीत केलेली वयोमर्यादा,शैक्षणिक अर्हता,मागासवर्गीयांसाठीचे आरक्षण इत्यादी बाबी विचारात घेऊन जाहिरात देण्यात यावी.

४) उपरोक्त रिक्त पद भरतांना शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश,शासन निर्णय,अटी व शर्ती विचारात घेण्यात येऊन विहित सेवा भरती पध्दतीचा अवलंब करावा.

५) उपरोक्त नमुद रिक्त पदे भरतांना महाराष्ट्र शासन,विद्यापिठ अनुदान आयोग व संबंधित विद्यापिठाच्या सर्व नियमांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

६) रिक्त जागा भरतांना वित्त विभागाचे शासन निर्णय दि.०२ जून,२०१५ व दि.१५ जानेवारी,२०१६ मधील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७) रिक्त पदे भरतांना शासन निर्णय एमएसडब्ल्यू-२००२/प्र.क्र.३६६/सुधार-१,दिनांक १ सप्टेंबर,२००५ मधील परिच्छेद क्र.(३) नुसार महाविद्यालयातील सर्व शिक्षक गृहीत धरुन १४:०१ प्रमाणे विद्यार्थी संख्या असणे बंधनकारक आहे.

८) शासन निर्णय शासन निर्णय सीएसडब्ल्यू-२००२/प्र.क्र.३६३/भाग-२/सुधार-१ दिनांक २४ ऑगस्ट,२००४ नुसार २००४-०५ नंतर समाजकार्य महाविद्यालयांना वाढीव विद्यार्थी संख्या देणे पूर्णपणे बंद करण्यात यावे असे आदेश आहेत. त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

९) सदरचे नाहरकत ज्या पदांसाठी दिली आहे त्या पदांसाठी आवश्यक असणारी विद्यार्थी संख्या कमी झाल्यास किंवा विद्यार्थी संख्या कमी झाल्याचे निदर्शनास आल्यास दिलेले नाहरकत आपोआप रद्द होईल.

१०) शासनाने पद भरतीसाठी विहीत केल्यानुसार निवड समिती स्थापन करुन निवड प्रक्रिया राबवावी व यामध्ये संपूर्ण पारदर्शकता असावी.

११) सदरील पद भरतीची प्रक्रीया संस्थेने/महाविद्यालयाने एका वर्षाच्या आत पूर्ण करावी.

१२) उपरोक्त अटी व शर्ती तसेच शासनाचे समाजकार्य महाविद्यालयासंदर्भातील निकष व निर्देश यांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

उपरोक्त दिलेल्या परवानगी मधील पदांमध्ये पदांच्या संख्येमध्ये बदल करणे,जाहिरातीस स्थगिती देणे किंवा भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(सिध्दार्थ अ. झाल्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १ मुंबई/नागपूर

३) महालेखापाल लेखा व परिक्षा, महाराष्ट्र १ मुंबई/नागपूर

४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

५) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, अमरावती

६) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ

७) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ

८) अवर सचिव, अर्थसंकल्प, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

९) प्राचार्य, महात्मा जोतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ

१०) निवडनस्ती